## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० ऑगस्ट २०१८.

## अधिसूचना

**हिंदू विवाह अधिनियम, १९५५.**

क्रमांक सीआरसी. १६१७/प्र.क्र.२३४/का.बारा.–महाराष्ट्र राज्याला लागू असल्याप्रमाणे हिंदू विवाह अधिनियम, १९५५ (१९५५ चा २५) चे कलम ३ च्या खंड (ब) ने बहाल केलेल्या आणि शासनास याबाबत असलेल्या सर्व सहाय्यभूत अधिकारांचा वापर करून, आणि बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर, मोताळा व नांदुरा तालुक्यांचे संदर्भात यापूर्वी जारी केलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः सुधारणा करून महाराष्ट्र शासन याद्वारे निर्देशित करिते की, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा महा. १४) अंतर्गत शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/१२, दिनांक २५ नोव्हेबर २००९ अन्वये विनिर्दिष्ट बुलढाणा जिल्ह्यातील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठस्तर) मलकापूर हे न्यायालय दिनांक १६ ऑगस्ट, २०१८ पासून शासकीय अधिसूचना क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/का. बारा. दिनांक २५ नोव्हेंबर २००९ आणि क्रमांक सीआरसी. १६०८/९८०/(१९६)/का. बारा, दिनांक २१ मार्च २०१२ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे महाराष्ट्र दिवाणी न्यायालये अधिनियम (१८६९ चा १४) अंतर्गत स्थापित मलकापूर, मोताळा व नांदुरा येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठस्तर न्यायालयांच्या साधारण अधिकारितेच्या स्थळ सीमांमध्ये हिंदू विवाह अधिनियम, १९५५ खालील प्रकरणे हाताळण्याची अधिकारिता असलेले दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर मलकापूर, जिल्हा बुलढाणाचे न्यायालय असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. श्या. कलोती,**

शासनाचे सहसचिव.